मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेच्या विविध विषय समितींच्या सभापतींची निवडणूक संपन्न

## महापालिकेच्या विविध विषय समितींच्या सभापती पदी निवड करण्यासाठी विशेष सभा पार पडली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध समितींच्या सभापतीपदाची निवडणूक पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनामधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृह येथे संपन्न झाली. यामध्ये विधी समिती सभापतीपदी सुजाता बोराटे, महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी राणी पठारे, शहर सुधारणा समिती सभापतीपदी संजय नाना काटे, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापतीपदी कैलास कुटे आणि शिक्षण समिती सभापतीपदी रविना आंगोळकर यांची निवड झाली आहे.




महापालिकेच्या विविध विषय समितींच्या सभापती पदी निवड करण्यासाठी आज त्या त्या समितीची विशेष सभा पार पडली. या सभेचे पिठासीन अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त यांचे प्रतिनिधी तथा पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी कामकाज पाहिले. नवनिर्वाचित सभापतींना पिठासीन अधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांनी पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.

यावेळी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांच्यासह अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, नगरसचिव मुकेश कोळप, विशेष अधिकारी किरण गायकवाड यांच्यासह नगरसदस्य व नगरसदस्या उपस्थित होते. जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी सूत्रसंचालन केले.

तर, विधी समितीच्या विशेष सभेला समितीचे सदस्य ज्ञानेश्वर जगताप, कुंदा भिसे, कुशाग्र कदम, शेखर चिंचवडे, वर्षा जगताप, महिला व बालकल्याण समितीच्या विशेष सभेला समितीचे सदस्य पल्लवी जगताप, निता पाडाळे, रेश्मा भुजबळ, शिवानी नरळे, सुप्रिया चांदगुडे, निकिता कदम, सारिका मासूळकर, शहर सुधारणा समितीच्या विशेष सभेला समितीचे सदस्य अर्चना सस्ते, कुणाल वाव्हळकर, उत्तमराव केंदळे, अनंत कोऱ्हाळे, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीच्या विशेष सभेला समितीचे सदस्य शाम जगताप, तानाजी बारणे, धर्मपाल तंतरपाळे, योगेश लांडगे, जितेंद्र ननवरे आणि शिक्षण समितीच्या विशेष सभेला समितीचे सदस्य पल्लवी वाल्हेकर, कविता भोंगाळे, रिटा सानप, सारिका बोऱ्हाडे, प्रियांका कुदळे, योगिता बारणे उपस्थित होते.

### विशेष समितींच्या सभांचे वार

- » विधी समिती – १ व ३ रा शुक्रवार, दुपारी ३ वाजता
- » महिला व बालकल्याण समिती – २ व ४ था गुरुवार, दुपारी २.३० वाजता
- » शहर सुधारणा समिती – २ व ४ था मंगळवार, दुपारी २ वाजता
- » क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती – २ व ४ था शुक्रवार, दुपारी २.३० वाजता
- » शिक्षण समिती – १ व ३ रा गुरुवार, दुपारी २.३० वाजता

# शहराचा नावलौकिक वाढवण्यासाठी पारदर्शक आणि गतीमान कारभारावर भर देणार : अभिषेक बारणे

## पदभार स्वीकारल्यानंतर नवनिर्वाचित सभापती अभिषेक बारणे यांनी शहराच्या सर्वांगीण विकासाबाबत आपली भूमिका स्पष्ट केली

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या स्थायी समितीच्या सभापती पदी निवड झाल्यानंतर अभिषेक बारणे यांनी आज आपल्या पदाचा अधिकृत कार्यभार स्वीकारला. महापालिका भवनातील स्थायी समिती सभापतींच्या दालनात हा पदभार स्वीकारण्याचा सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी चिंचवड विधानसभेचे आमदार शंकरभाऊ जगताप यांनी नवनिर्वाचित सभापती अभिषेक बारणे यांचे पुष्पगुच्छ देऊन विशेष अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



पदभार स्वीकारल्यानंतर नवनिर्वाचित सभापती अभिषेक बारणे यांनी शहराच्या सर्वांगीण विकासाबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. पिंपरी-चिंचवड शहराचा विस्तार वेगाने होत असून नागरिकांच्या अपेक्षाही वाढत आहेत, अशा परिस्थितीत स्थायी समितीची जबाबदारी मोठी असल्याचे त्यांनी नमूद केले. शहराचा विकास आराखडा डोळ्यासमोर ठेवून रखडलेले प्रकल्प मार्गी लावण्याला आपले सर्वोच्च प्राधान्य असेल, असे त्यांनी सांगितले.

शहराच्या विकासावर प्रतिक्रिया देताना अभिषेक बारणे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड हे देशातील एक प्रगत शहर म्हणून ओळखले जाते. या शहराचा नावलौकिक वाढवण्यासाठी पारदर्शक आणि गतीमान कारभारावर माझा भर राहील. प्रामुख्याने पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, रस्ते विकास आणि आरोग्य सुविधा यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर स्थायी समितीच्या माध्यमातून ठोस निर्णय घेतले जातील. सामान्य नागरिकांच्या करातून जमा होणारा पैसा हा शहराच्या हितासाठी आणि दर्जेदार कामांसाठीच खर्च होईल, याची काटेकोरपणे खबरदारी घेतली जाईल.

आमदार शंकरभाऊ जगताप, आमदार महेशदादा लांडगे, आमदार उमाताई खापरे, आमदार अमित गोरखे यांच्या मार्गदर्शनाखाली शहराच्या विविध भागांतील प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासनाशी समन्वय साधून काम करणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

तरुण आणि अभ्यासू नेतृत्व म्हणून अभिषेक बारणे यांच्याकडे पाहिले जाते, त्यामुळे त्यांच्या कार्यकाळात प्रामुख्याने पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, रस्ते विकास आणि आरोग्य सुविधा यांसारख्या मूलभूत सुविधांना प्राधान्य असेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी तातडीने प्रशासकीय कामाचा आढावा घेण्यास सुरुवात केली असून, आगामी काळात शहरातील सुरु असलेले आणि प्रलंबित विकासकामे मार्गी लावण्यासाठी ते सज्ज झाले आहेत.

# महिंद्रा लॉजिस्टिक लि. मध्ये ऐतिहासिक वेतनवाढ करार..!

## आमदार महेश लांडगे यांची कंपनी व्यवस्थान- संघटनेत यशस्वी मध्यस्थी; कामगारांकडून करारानंतर आनंदोत्सव

**पिंपरी | प्रतिनिधी**

महिंद्रा लॉजिस्टिक लि. आणि स्वाभिमानी श्रमिक कामगार संघटना यांच्यातील तिसरा वेतनवाढ करार संपन्न झाला असून, हा लॉजिस्टिक उद्योगातील इतिहासातील सर्वात मोठा विक्रमी करार ठरला आहे. हा करार चाकण औद्योगिक वसाहतीत निघोजे येथील कंपनीच्या कार्यालयात आयोजित कार्यक्रमात औपचारिक केला गेला.या करारानंतर कामगारांनी समाधान व्यक्त केले आहे.

करार सोहळ्यात संघटनेच्या वतीने प्रमुख सल्लागार आमदार महेश लांडगे, रोहिदास गाडे, अध्यक्ष जीवन येळवंडे, तसेच कंपनीकडून असोसिएट व्हा. प्रेसिडेंट एच. आर. संजय गावडे आणि असिस्टंट व्हा. प्रेसिडेंट एच. आर. प्रदीप झोटिंग प्रमुख उपस्थित होते.



करारातील प्रमुख सुविधा पुढीलप्रमाणे आहेत. यामध्ये एकूण पगारवाढ: ₹15,500/- (CTC मध्ये), रेशो ३०%, ३०%, ४०%,विभागणी २५% DA बेसिक, ७५% इतर अलाऊन्स. कराराचा कालावधी: ०१/०३/२०२६ ते ३१/०८/२०२९ (साडेतीन वर्षे). रजा सुधारणा: ३६६ कामगारांच्या रजेत ३ दिवसांची वाढ, सर्वांसाठी समान रजा. पगाराची उचल: ग्रॉस पगाराच्या तीनपट वैद्यकीय कारणांसाठी मंजूर. ग्रुप एक्सीडेंट पॉलिसी: ₹5 लाख. ग्रुप टर्म इन्शुरन्स पॉलिसी: ₹5 लाख. करार वेळेत पूर्ण होण्याबद्दल बक्षीस: ₹7,500/- सर्व कामगारांना. बोनस: मागील आर्थिक वर्ष २४–२५: ₹39,200/-, २०२६–२९ दरम्यान वाढीव रक्कम: ₹43,800 ते ₹59,100/-उत्पादन वाढ: पहिल्या तीन वर्षांत दर वर्षी ७%, पुढील सहा महिन्यांसाठी ३.५% असा आहे.

करारावर सह्या करताना संघटनेच्या वतीने आमदार महेश लांडगे, संघटनेचे मार्गदर्शक रोहिदास गाडे, अध्यक्ष जीवनशेठ येळवंडे आणि व्यवस्थापनाकडून संजय गावडे, प्रदीप झोटिंग, धीरज सिंह, निंबा भांबरे, नामदेव टाचतोडे, राहुल भागवत यांचा समावेश होता. कार्यक्रमात सर्व उपस्थित कामगारांना मार्गदर्शन मिळाले आणि आनंद साजरा करण्यासाठी पेढे वाटणे आणि फटाके फोडण्याचा सोहळा पार पडला. संघटनेच्या नेतृत्वाखाली आणि व्यवस्थापनाच्या सहकार्याने संपन्न झालेला हा करार कामगारांच्या हक्कांचा मजबूत दाखला असून, लॉजिस्टिक क्षेत्रातील मानवी विकासाला नवीन दिशा देणारा ठरला आहे.

> **“महिंद्रा लॉजिस्टिकमधील कामगार हे फक्त आमच्या कंपनीचे आधारस्तंभ नाहीत, तर ते उद्योगाचा आत्मा आहेत. या कराराद्वारे आम्ही फक्त पगारवाढ देत नाही, तर कामगारांच्या जीवनमानात खऱ्या अर्थाने सुधारणा घडवून आणत आहोत. रजा, बोनस, आरोग्य सुरक्षा आणि उत्पादन वृद्धी यासारख्या सर्व बाबींचा विचार करून हा करार करण्यात आला आहे. आम्ही विश्वास ठेवतो की कामगार जेवढे सुरक्षित, संतुष्ट आणि प्रोत्साहित असतील, तितकेच कंपनीचे यश अधिक दृढ होईल. आमचा उद्देश आहे की प्रत्येक कामगाराला न्याय मिळावा, त्यांना त्यांच्या मेहनत आणि योगदानाची खरी कदर होईल, आणि हा करार त्याच दृष्टीने इतिहासात एक ठळक उदाहरण बनेल.”**
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# प्रदूषण नियंत्रण मंडळाचा अपारदर्शक कारभार; ‘लीगल नोटीस’ विभाग ऑगस्टपासून बंद

## प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अपारदर्शकतेमुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या हवेची गुणवत्ता धोक्यात

**पिंपरी | प्रतिनिधी**

एकीकडे पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या हवेत दरवर्षी हजारो टन सिमेंटची विषारी धूळ मिसळत आहे, तर दुसरीकडे मुळा-मुठा नदीत राजरोसपणे विनाप्रक्रिया सांडपाणी सोडले जात आहे. मात्र, कारवाईचा बडगा उगारण्याऐवजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) ‘तांत्रिक अडचणींचे’ कारण पुढे करत आपल्या कारभारावर अपारदर्शकतेचा पडदा टाकला आहे. ‘एमपीसीबी’च्या अधिकृत संकेतस्थळावरील ‘लीगल नोटीस’विभाग ऑगस्ट २०२५ पासून बंद असून, दररोज प्रसिद्ध होणे बंधनकारक असलेला हवा गुणवत्ता निर्देशांक (एक्युआय) ही उपलब्ध नाही.

.पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातून दररोज तयार होणाऱ्या सांडपाण्यापैकी शेकडो दशलक्ष लिटर सांडपाणी कोणत्याही प्रक्रियेशिवाय थेट मुळा-मुठेच्या पात्रात सोडले जाते. तसेच नदीकाठचे आणि एमआयडीसी परिसरातील अनेक छोटे-मोठे उद्योग रासायनिक सांडपाणी रात्रीच्यावेळी थेट नदी किंवा नाल्यांमध्ये सोडतात. त्यामुळे अनेकदा नदीत पांढरा फेस साचल्याचे चित्र दिसते. परिणामी प्रदूषणाची पातळी वाढल्याने नद्यांमध्ये जलपर्णीचे साम्राज्य, नदीकाठच्या नागरिकांना डास आणि दुर्गंधीचा प्रचंड त्रास सहन करावा लागतो. तसेच पाण्यातील विरघळलेल्या ऑक्सिजनची पातळी अनेक ठिकाणी शून्यावर किंवा अत्यंत धोकादायक पातळीवर आली आहे. यामुळे नदीतील मासे आणि इतर जीवसृष्टी नष्ट झाली आहे.




### रोज अहवाल सादर करणे अनिवार्य

- आरएमसी आणि बांधकाम क्षेत्राचा मोठा वाटा
- पुण्यात सुमारे १९७ अधिकृत आणि १७५ पेक्षा जास्त बेकायदा आरएमसी प्रकल्प
- नियमांनुसार पाणी मारणे, वृक्षारोपण, जाळी लावणे, टायर धुण्याची व्यवस्था बंधनकारक; प्रत्यक्षात अंमलबजावणी नाही
- परिणामी पीएम १० आणि पीएम २.५ कणांचे प्रमाण वाढून दमा, खोकला आदी आजार वाढत आहेत.
- अधिकाऱ्यांच्या मते ७०-७५ प्रकल्प; त्यापैकी ४७ ला क्लोजर नोटीस
- किती प्रकल्प बंद झाले याबाबत अस्पष्ट माहिती
- पर्यावरणीय प्रशासनात पारदर्शकतेचा अभाव हा लोकशाही व्यवस्थेसाठी गंभीर मुद्दा
- प्रदूषण नियंत्रण संस्थेचे संकेतस्थळ बंद असणे किंवा अद्ययावत माहिती न देणे हे जनतेच्या माहितीच्या अधिकारावर प्रश्नचिन्ह निर्माण करते
- आरोग्य, नदी परिसंस्था आणि शहरी जीवनमानावर थेट परिणाम

### संकेतस्थळावर पारदर्शकतेचा अभाव

- ऑगस्ट २०२५ पासून ‘लीगल नोटीस’ विभाग बंद.
- दररोज प्रसिद्ध होणे बंधनकारक असलेला हवा गुणवत्ता निर्देशांक उपलब्ध नाही.
- कारण म्हणून ‘तांत्रिक अडचणी’ असल्याचे सांगितले जात आहेत.

### या गोष्टी गरजेच्या

- कोणत्याही प्रकल्पाची धूळ उडू नये म्हणून पाणी मारणे
- पाच मीटर पट्ट्यात वृक्षारोपण करणे
- २० मीटर उंचीपर्यंत पानांचे आच्छादन लावणे
- ट्रकचे टायर धुण्याची व्यवस्था करणे बंधनकारक
- पीएम १० आणि पीएम २.५ हे अत्यंत सूक्ष्म व घातक कण हवेत मिसळून नागरिकांना दमा आणि खोकल्यासारखे श्वसनाचे गंभीर आजार जडत आहेत, यावर उपाययोजना करण्याची गरज आहे

# अधिकारी आता रोज दोन तास प्रभागात; आयुक्तांचा आदेश

## प्रलंबित तक्रारींची दखल घेत आयुक्तांनी अधिकाऱ्यांना दोन तास प्रत्यक्ष स्थळ पाहणी करणे बंधनकारक केले

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेकडून नागरिकांसाठी शहरात विविध विकासकामे, प्रकल्प, तसेच सोयीसुविधा दिल्या जातात. मात्र, संबधित ठिकाणी योग्य पद्धतीने काम होत नसल्यास नागरिकांकडून क्षेत्रीय कार्यालय, महापालिका आयुक्त कार्यालय, तसेच पालिकेच्या वेगवेगळ्या तक्रार निवारण प्रणालीवर तक्रारी केल्या जातात.

या तक्रारी सोडविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष तक्रारीच्या ठिकाणी पाहाणी करणे अपेक्षित असते. मात्र, त्याकडे अधिकारी दुर्लक्ष करत असल्याने तक्रारी तशाच प्रलंबित राहतात. त्यामुळे आता परिमंडळ उपायुक्त व महापालिका सहाय्यक आयुक्त, तसेच सर्व विभागांच्या अभियंत्यांना तक्रारीच्या ठिकाणी स्थळ पाहणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

याबाबतचे आदेश महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी काढले असून,




### रोज अहवाल सादर करणे अनिवार्य

» तक्रारस्थळी भेट दिल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी दररोज अहवाल सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. उपायुक्त व सहाय्यक आयुक्तांनी आपला अहवाल अतिरिक्त आयुक्तांना, तर अभियंत्यांनी शहर अभियंत्यांना सादर करायचा आहे. त्यामुळे कामकाजावर नियंत्रण ठेवणे सुलभ होणार आहे.

दररोज सकाळी ९.४५ ते ११.४५ या कालावधीत ही पाहणी करणे बंधनकारक असणार आहे. त्यामुळे आता अधिकाऱ्यांवरही जबाबदारी निश्चित झाली आहे.

काही दिवसांपूर्वी महापौर मंजुषा नागपूरे यांनी पालिका प्रशासनास याबाबत आदेश दिले होते. शहरात सकाळच्या वेळी अधिकाऱ्यांनी प्रभागात फिरल्यास त्यांना पदपथ, रस्ते, अतिक्रमणे, चेंबर, ड्रेनेज अशा समस्यांची माहिती झाल्यास तत्काळ त्या समस्या सोडविता येतील, तसेच नागरिकांना तक्रारी करण्याची वेळ येणार नाही.

त्यामुळे सर्व क्षेत्रीय कार्यालयाच्या स्तरावर असा उपक्रम राबविण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर आता आयुक्तांनी अधिकाऱ्यांनी सरसकट न जाता ज्या ठिकाणांबाबत दररोज नागरिकांच्या सूचना अथवा तक्रारी येतील, अशा ठिकाणी भेट देऊन त्याचा अहवाल दररोज सादर करण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यानुसार सर्व उपायुक्त, तसेच महापालिका सहय्यक आयुक्तांनी आपला अहवाल संबधित अतिरिक्त आयुक्तांना सादर करायचा आहे. सर्व अभियंत्यांनी आपला अहवाल शहर अभियंत्यांना सादर करायचा आहे.

तक्रारी सोडविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष तक्रारीच्या ठिकाणी पाहाणी करणे अपेक्षित असते. मात्र, त्याकडे अधिकारी दुर्लक्ष करत असल्याने तक्रारी तशाच प्रलंबित राहतात. त्यामुळे आता परिमंडळ उपायुक्त व महापालिका सहाय्यक आयुक्त, तसेच सर्व विभागांच्या अभियंत्यांना तक्रारीच्या ठिकाणी स्थळ पाहणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

### स्थळ पाहणी सक्तीची

» पुणे महानगरपालिकाने नागरिकांच्या तक्रारी तत्काळ सोडविण्यासाठी अधिकाऱ्यांना स्थळ पाहणी बंधनकारक केली आहे. परिमंडळ उपायुक्त, सहाय्यक आयुक्त आणि सर्व विभागांचे अभियंते यांनी दररोज सकाळी ९.४५ ते ११.४५ या वेळेत तक्रारस्थळी भेट देणे आवश्यक आहे. यामुळे तक्रारी प्रलंबित राहणार नाहीत आणि प्रत्यक्ष पाहणीमुळे समस्या जलद मार्गी लागतील.

### नागरिकांना दिलासा

» या निर्णयामुळे पदपथ, रस्ते, ड्रेनेज, अतिक्रमण यांसारख्या समस्या तातडीने सोडविण्यास मदत होणार आहे. सकाळी अधिकाऱ्यांनी प्रभागात फिरल्यास नागरिकांना तक्रार करण्याची वेळ येणार नाही. प्रशासनाची जबाबदारी निश्चित झाल्याने नागरिकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

# पुण्यातील गणेशखिंड रस्त्यावरील उड्डाणपूल वाहतुकीसाठी राहणार बंद !

## बाणेर, बालेवाडी यासह हिंजवडी आयटी पार्क कडे जाण्यासाठी गणेशखिंड रस्त्याचा वापर नागरिकांकडून केला जातो

**पुणे | प्रतिनिधी**

गणेशखिंड रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहेत. या रस्त्यावर उड्डाणपूल तसेच मेट्रो मार्गाचे काम सुरू असल्याने सकाळी आणि संध्याकाळी वाहतूक कोंडी होते. वाहनचालक तासनतास वाहतूक कोंडीत अडकून पडत असल्याने वाहनचालकांकडून नाराजी व्यक्त केली जाते.



बाणेर, बालेवाडी यासह हिंजवडी आयटी पार्क कडे जाण्यासाठी गणेशखिंड रस्त्याचा वापर नागरिकांकडून केला जातो. हिंजवडी येथील कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी हा रस्ता अत्यंत महत्वाचा आहे. मात्र या रस्त्यावर होत असलेल्या वाहतुकीच्या समस्येमुळे नोकरदार हैराण झाले आहेत. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि इतर शैक्षणिक संस्थाकडे जाण्यासाठी देखील गणेशखिंड रस्त्याचा वापर केला जातो.

या रस्त्यावरील आनंदऋषीजी चौकात (पुणे विद्यापीठ चौक) येथे काही वर्षांपूर्वी उभारण्यात आलेला उड्डाणपूल पाडून टाकण्यात आला असून येथे नवीन उड्डाणपूल उभारण्यात येत आहे. तसेच या रस्त्यावर शिवाजीनगर ते हिंजवडी मेट्रो प्रकल्पाचे काम देखील गेल्या काही वर्षापासून सुरु असल्याचे वाहतूक कोंडीत अधिकच भर पडते. या रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी महापालिका तसेच पोलीस प्रशासनाच्या वतीने विविध उपाय योजना सुरू करण्यात आले आहेत. काही चौकातील यू टर्न बंद करण्यात आले असून याचा फायदा वाहतूक सुरळीत होण्यासाठी होत असल्याचे समोर आले आहे.

महापालिकेने या उड्डाणपुलावरील १४ बेअरिंग बदलण्याचे काम यापूर्वी पूर्ण केले आहे. मात्र, दिवसभर या पुलावरून ये जा करणाऱ्या वाहनांची संख्या मोठी असल्याने पुलाच्या सांध्यांचे काम प्रलंबित राहिले आहे. हे काम पूर्ण होणे गरजेचे आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर या उड्डाणपुलाची स्थिती अधिकच मजबूत होणार आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने हे काम करण्याचा निर्णय घेतला आहे अशी माहिती महापालिकेच्या प्रकल्प विभागाचे मुख्य अभियंता दिनकर गोजारे यांनी दिली. पुढील महिनाभर हे काम सुरू राहणार आहे.

### कोणत्या वेळेत राहणार वाहतूक बंद ?

» या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असल्याने दिवसा काम करणे अशक्य आहे. महापालिकेने हे काम दिवसाच्या वेळेस सुरू केल्यास मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीत भर पडून त्याचा त्रास नागरिकांना तसेच वाहन चालकांना होणार आहे. त्यामुळे दररोज रात्री ११ ते पहाटे ५ वाजेपर्यंत या उड्डाणपुलाचा एक मार्ग बंद राहणार आहे. एक महिन्याच्या काळात रात्रीच्या वेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडे जाणाऱ्या दोन पैकी एक मार्ग बंद बंद ठेवला जाईल. टप्प्याटप्प्याने हे काम पूर्ण केले जाणार आहे असे, महापालिकेतील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# मध्यरात्री पुणेकरांची पेट्रोल पंपांवर धाव !

## इराण आणि इस्रायलमधील युद्धामुळे पेट्रोल-डिझेल महाग होणार असल्याच्या अफवेने पुण्यात खळबळ उडाली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील मुख्य रस्ते आणि उपनगरातील पेट्रोल पंपांवर दुचाकी आणि चारचाकी वाहन चालकांच्या रविवारी (१ मार्च) मध्यरात्री बाराच्या सुमारास लांबच लांब रांगा लागल्या. इराण आणि इस्रायल यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाचे दर वाढणार आणि मध्यरात्रीपासूनच देशातील पेट्रोल-डिझेल महागणार, या चर्चेने पुणेकरांमध्ये खळबळ उडाली. मात्र, 'आखाती देशातील युद्धामुळे पेट्रोल डिझेलच्या किमतीत वाढ होणार, या केवळ अफवा आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झालेला दिसतो. देशातील पेट्रोल, डिझेलच्या दरात कोणतीही वाढ होणार नाही. अजून काही महिने पुरेल, इतका तेलसाठा देशात उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांनी पेट्रोल पंपावर रांगा लाऊ नयेत,' असे आवाहन ऑल इंडिया पेट्रोल पंप असोसिएशनच्या वतीने करण्यात आले.



### 'पेट्रोल डिझेलच्या किमतीत वाढ नाही'

» केंद्र सरकार किंवा पेट्रोलियम कंपन्यांनी दरवाढीबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. 'इराण-इस्रायल युद्धामुळे आखाती देशांतून पेट्रोलची आयात करता येणार नाही. त्यामुळे देशातील पेट्रोल, डिझेलच्या किमती वाढतील, अशा प्रकारचा संभ्रम निर्माण झालेला दिसतो. मात्र, असे काहीही होणार नाही. आखाती देशांमधून कच्च्या तेलाचा पुरवठा झाला नाही, तरी देशातील तेलपुरवठ्यावर त्याचा मोठा परिणाम होणार नाही. रशियाकडून होणारा तेलपुरवठा अद्याप सुरक्षित आहे. तसेच कित्येक महिने पुरेल इतका तेलसाठा आपल्या देशात आहे. त्यामुळे नागरिकांनी पेट्रोल पंपावर रांगा लावू नयेत,' असे आवाहन ऑल इंडिया पेट्रोल पंप असोसिएशनचे राष्ट्रीय प्रवक्ता अली दारूवाला यांनी केले आहे.

'रविवारी रात्री सोशल मीडियावर एक मेसेज व्हायरल झाला. त्यात मध्यपूर्वेतील युद्धामुळे कच्च्या तेलाचा पुरवठा खंडित झाला असून, आज रात्री बारा पासूनच पेट्रोलच्या किमतीत लिटरमागे ५ ते १० रुपयांनी मोठी वाढ होणार आहे, असे सांगण्यात आले. त्यामुळे आत्ता गाडी फुल्ल करून घ्यायची आहे,' अशी प्रतिक्रिया नळ स्टॉप जवळच्या एका पेट्रोल पंपावर मध्यरात्री पेट्रोल भरायला रांगेत उभ्या राहिलेल्या एकाने दिली. अशा प्रकाराच्या चर्चेमुळे नागरिकांनी आपापल्या दुचाकी आणि चारचाकी गाड्या घेऊन थेट पेट्रोल पंपांकडे धाव घेतल्याचे दिसून आले. रविवारी आठवड्याचा शेवटचा दिवस असल्याने खरेदीसाठी नागरिक मोठ्या प्रमाणात बाहेर पडले. त्यात सोमवारी कामाच्या पहिल्या दिवशी घाई नको म्हणून, मध्यमवर्गानेही रविवारी पेट्रोल पंपावर रांगा लावल्या होत्या.

शहरातील काही भागात मध्यरात्री सुरू असलेल्या पेट्रोल पंपांवर वाहनांच्या रांगा थेट मुख्य रस्त्यापर्यंत पोहोचल्या. त्यामुळे अनेक ठिकाणी वाहतूक कोंडीचे चित्र निर्माण झाले. आपला नंबर आधी यावा, म्हणून घाई करणाऱ्या वाहनचालकांमध्ये काही ठिकाणी बाचाबाचीचे प्रसंगही घडल्याचे दिसून आले. 'मी एका तासापासून रांगेत उभा आहे. उद्या पेट्रोल महाग होणार असं ऐकलं, म्हणून गाडी फुल्ल करून घेतोय,' अशी प्रतिक्रिया एका त्रस्त नागरिकाने व्यक्त केली.

रशियाकडून होणारा तेलपुरवठा अद्याप सुरक्षित आहे. तसेच कित्येक महिने पुरेल इतका तेलसाठा आपल्या देशात आहे. त्यामुळे नागरिकांनी पेट्रोल पंपावर रांगा लावू नयेत,' असे आवाहन ऑल इंडिया पेट्रोल पंप असोसिएशनचे राष्ट्रीय प्रवक्ता अली दारूवाला यांनी केले आहे.

### सध्या पेट्रोल, डिझेलचे दर किती ?

» सध्या पुण्यात पेट्रोल सुमारे १०४ ते १०६ रुपये प्रति लिटर, तर डिझेल ९० ते ९२ रुपये प्रति लिटरच्या दराने मिळत आहे. दरम्यान, नव्या नियमांनुसार या किमती दररोज बदलतात.

### परिस्थिती काय?

» 'रविवारी रात्री सोशल मीडियावर एक मेसेज व्हायरल झाला. त्यात मध्यपूर्वेतील युद्धामुळे कच्च्या तेलाचा पुरवठा खंडित झाला असून, आज रात्री बारा पासूनच पेट्रोलच्या किमतीत लिटरमागे ५ ते १० रुपयांनी मोठी वाढ होणार आहे, असे सांगण्यात आले. त्यामुळे आत्ता गाडी फुल्ल करून घ्यायची आहे,' अशी प्रतिक्रिया नळ स्टॉप जवळच्या एका पेट्रोल पंपावर मध्यरात्री पेट्रोल भरायला रांगेत उभ्या राहिलेल्या एकाने दिली.

# पीएमआरडीए हद्दीतील त्या विशिष्ट बांधकामांना निर्बंध

## बीडीपी आणि डोंगर उतार क्षेत्रात तूर्तास परवानगी नाही; नगरविकास विभागाचे कडक आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा (पीएमआरडीए) प्रारुप विकास आरखडा रद्द झाल्यानंतर आता डीपी ऐवजी स्ट्रक्चर प्लॅन करण्याच्या सूचना राज्य शासनाने दिल्या होत्या. त्यामुळे आता नवीन प्लॅन होईपर्यंत काही विशिष्ट क्षेत्रास परवानग्यांवर राज्य शासनाने निर्बंध घातले आहेत. त्यानुसार बीडीपी झोन, डोंगर उतार क्षेत्र, तसेच आरक्षण दर्शवलेल्या जागेवर तुर्तास बांधकाम परवानगी देऊ नये, असे आदेश नगरविकास विभागाने काढले आहेत.




पीएमआरडीएचा विकास आरखाडा मुख्यमंत्री तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष देवेंद्र फडणवीस यांनी रद्द केला. त्यानंतर डीपीऐवजी प्राधिकरणाचा विकास हा स्टक्चरल प्लॅनच्या माध्यमातून करण्याच्या सूचन केल्या होत्या. दरम्यान, या प्लॅनच्या माध्यमातून पीएमआरडीएला भविष्यात निर्माण होणाऱ्या अडचणी व विकासकामाबाबत येणारे तांत्रिक दुवे याचे निराकरण करण्याच्या दृष्टिने पीएमआरडीएने नगरविकास विभागाकडे मार्गदर्शन मागवले होते.

त्यानुसार आता पीएमआरडीएच्या हद्दीत विकास परवानग्यांना तुर्तास निबंर्ध घालण्यात आले आहेत. पीएमआरडीएने प्रारुप विकास योजनेत समाविष्ट रस्ते आणि आरक्षणासाठी देण्यात येणारया टीडीआर प्रस्तांवावर आधीच कार्यवाही केली आहे.

दरम्यान, प्रस्तावित रिंग रस्त्याच्या बाबतीत तीन गावांचा विरोध आहे. त्यामुळे आखणीत बदल आवश्यक ठरल्याने अंशतः सुधारणा प्रस्तावित करण्यात आला आहे. त्यानुसार रिंग रोड अंमलबाजावणीची प्रक्रीया करण्यात आली आहे. सुधारित रिंग रोडचा स्टक्चरल प्लॅनमध्ये समाविष्ट करण्याचे नियोजन असल्याचे सांगण्यात आले.

### विकास परवानग्यांवर तात्पुरते निर्बंध

» पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचा प्रारूप विकास आराखडा रद्द झाल्यानंतर राज्य शासनाने डीपीऐवजी स्ट्रक्चर प्लॅन तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. नवीन आराखडा तयार होईपर्यंत बीडीपी झोन, डोंगर उतार क्षेत्र तसेच आरक्षण दर्शवलेल्या जागांवर बांधकाम परवानग्या देऊ नयेत, असे आदेश नगरविकास विभागाने जारी केले आहेत. सुधारित रिंग रोडसह भविष्यातील विकासकामे स्ट्रक्चर प्लॅनमध्ये समाविष्ट करण्याचे नियोजन असून, तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वांनुसार पुढील प्रक्रिया केली जाणार आहे.